प्र क र ण १ ले

मराठवाड्यातील सामाजिक व

राजकीय पार्श्वभूमी

# प्र क र ण १ ले

१.१ मराठवाड्यातील सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी.

१.२ मराठवाड्यातील शेतकऱ्यावरती निजाम राजवटीत होणारे जुलूम

१.३ हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस आणि हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाची चळवळ

१.४ हैद्राबाद चळवळीतील विचार-प्रवाह

# प्रकरण १ ले

## १.१ मराठवाडयातील सामाजीक आणि राजकीय पार्श्वभूमी.

सध्या मराठवाडा हा महाराष्ट्र राज्यातील एक विभाग समजला जातो. पूर्वी तो हैद्राबाद संस्थानांत होता. संयुक्त महाराष्ट्रांत सामील झाल्यानंतर मराठवाडयाचे पाच जिल्हे होते. सध्या मराठवाडा हा सात जिल्ह्यांचा बनलेला आहे. औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, लातूर व जालना हे जिल्हे येत असून महाराष्ट्रातील २० % भूभाग मराठवाडयाने व्यापलेला आहे. मराठवाडयाला संताची भूमी म्हणूनही वैशिष्ठय लाभलेले आहे. यादवांचे काळात पैठण हे विद्येचे केंद्र बनले होते. (१)

स्वातंत्र्यापूर्वी मराठवाडयात निजामाचे राज्य होते. हैद्राबाद संस्थान हे देशी संस्थानातील सर्वात मोठे संस्थान होते. ८२ हजार चौरस मैल क्षेत्र विस्तार होता. एक कोटी साठ लक्षाच्यावर लोकसंख्या होती. २६ कोटीचे उत्पन्न ह्या संस्थानाचे होते. हैद्राबाद संस्थान १६ जिल्ह्यांत विभागले होते. ८ जिल्हे तेलगु भाषिक, ५ जिल्हे मराठी भाषिक, ३ जिल्हे कानडी भाषिक होते. (२)

one should be careful while dealing with history

हैद्राबाद संस्थानाची स्थापना मोगलांचा दक्षिणेकडील सुभेदार मीर कमरोद्दीनखान याने इ. स. १७१२ साली केली. स्वत:ला स्वतंत्र राजा म्हणून त्याने औरंगजेबाच्या मृत्युनंतर घोषित केले. १७२४ मध्ये निजामाने स्वत:ची राजवट स्थापन केली. ही राजवट २२५ वर्षे टिकली. ब्रिटीशांच्या काळात निजामाने आपल्या दरबारी तैनाती फौज ठेवली.

याच फौजेच्या बळावर इंग्रजानी दक्षिण भारत आपल्या ताब्यात ठेवला.(३)

निजाम जर इंग्रजाना फितूर झाला नसता तर ९० वर्षापूर्वीच भारताचा इतिहास बदलला असता. हैद्राबाद संस्थान हे ब्रिटीशांच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे केंद्र होते. ब्रिटीश साम्राज्याचा केंद्र बिंदू अशादृष्टीने हैद्राबादचे वर्णन केले जात होते. भारतात चाललेल्या राष्ट्रवादी चळवळीची आगेकूच ब्रिटीशाना थांबवावयाची होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला आळा घालण्यासाठी या संस्थानाचा उपयोग ब्रिटीशाना करावयाचा होता.(४)

इंग्रजाना आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुस्लीमाना सत्तास्थानी बसवावयाचे होते. निजामाच्या हाती सत्ता गेल्यामुळे व निजामाभोवती धर्माधिका-याचे जाळे असल्यामुळे हिंदुंची अवस्था पददलीता-सारखी झाली होती . हिंदूंची सर्व बाजूनी कुंचबणा चालली होती. हैद्राबाद संस्थानात मराठी, तेलगू, कानडी व उर्दू या चार प्रमुख भाषा बोलणारे बहुभाषिक होते. हिंदु हे संख्येने जास्त होते, परंतु संख्येने अल्प असलेले मुस्लीम हे राज्यकर्ते होते. हैद्राबाद संस्थानात प्राथमिक शिक्षण सोडले तर शिक्षणाच्या सर्व थरात उर्दु हेच शिक्षणाचे माध्यम बनविले होते. त्यामुळे उर्दूचा प्रभाव हैद्राबाद संस्थानावर पर्यायाने मराठवाड्यावर होता.(५)

खाजगी शिक्षण संस्था चालविण्यास जवळ जवळ बंदीच होती. त्या काळात कोणताही सामाजिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम करावयाचा झाल्यास निजामाची परवानगी घ्यावी लागत असे. लोकांना कोणत्याही प्रकारचे राजकीय स्वातंत्र्य नव्हते. एवढेच नव्हे तर

प्रशासनामध्ये अधिका-यांच्या जागेवर मुस्लीमांचाच भरणा अधिक होता. कायद्याचे बंधन फक्त हिंदूनाच होते. मुस्लीम हे सरकारच्या खास मर्जितले होते.(६)

मुस्लीमाना सरास हत्यारे वापरण्याची परवानगी होती. जनतेची हिंदु मुस्लीम अशी विभागणी झाली होती. जीवनाची सर्व सुत्रे जातीय मुस्लीम धर्म धर्म मंडळाच्या हाती होती. सरकारी यंत्रणेत मुस्लीम अमीर-उमरावांचाच भरणा अधिक असे. बहुसंख्य समाज हा दडपणाखाली वावरत होता. जनतेचे मनोधैर्य अगदी खचलेले होते. सामाजीक जननीवन विस्कळीत होते. लोकजीवनाच्या सर्व नाडया मुस्लीम राजसत्तेच्या हाती गेल्या होत्या.(७)

निजाम सरकारने सर्व पातळीवर उर्दू अधिकृत भाषा म्हणून स्विकारलेली असल्यामुळे शिक्षणात उर्दू हा विषय अनिवार्य होता. परिक्षेचे माध्यम उर्दू असल्यामुळे इतर भाषांच्या विकासाला संधीच नव्हती. मराठी भाषिक विद्यार्थ्यांना नागपूर व पुणे येथे जावे लागत असे. याउलट मात्र मुस्लीमासाठी संस्थानात मुस्लीम एज्युकेशन कॉन्फरन्स होती. तिच्याकडे दरवर्षी तालुक्याच्या ठिकाणी होणा-या अधिवेशनातून दरवर्षी निधी गोळा होत असे. त्यातून गरीब मुस्लीम विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कर्ज मिळत असे. अनेकांना परदेशी शिक्षण घेण्यासाठी सहाय्य दिले गेले होते. इतर समाजासाठी तशाप्रकारची सोय नव्हती. निजामाचे शिक्षण विषयक धोरण बहुसंख्य जनतेच्यादृष्टीने प्रतिगामी स्वरूपाचे होते असे बिंदू यांचे मत होते.(८) त्यामुळे संस्थानात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. या कालावधीत राष्ट्रीय शिक्षण संस्था सुरु करून शिक्षणाची चळवळ पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न मराठवाडयातील इतर विभागातील लोकांनी (नेत्यानी) केलेला दिसतो. मराठवाडयात स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे,

गोविंदभाई श्रॉफ यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्थेची स्थापना केली.(९)

त्याचबरोबर मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाने देखील मुलांच्यासाठी वसतीगृहे हैद्राबाद व अन्यत्र काढली. स्वातंत्रापूर्वकाळात याच शिक्षण संस्था राजकीय चळवळीचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखल्या जावू लागल्या. याच खाजगी शिक्षण संस्थातून बाहेर पडलेल्या विद्यार्थी, शिक्षकांनी मुक्ती संग्रामाच्यावेळी अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांचा पुरवठा केला. शिक्षण संस्था ही राष्ट्रीय जागृतीची केंद्र बनत आहेत. यामुळेच निजाम शासन शिक्षण संस्था वाढू नयेत यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होते.(१०)

मराठवाडयाचा विचार केल्यास पांचही जिल्ह्यात सामाजीक व सांस्कृतिक परिस्थितीत फरक आढळून येतो. परभणी, औरंगाबाद,नांदेड हे जिल्हे त्यांना लाभलेल्या नैसर्गिक परिस्थितीमुळे प्रगत दिसून येतात. खानदेश विदर्भ या विभागास हा प्रदेश सलग असल्यामुळे त्यांनी नागपूर-पुणे येथे जावून शिक्षणाचा लाभ घेतला. याउलट उस्मानाबाद व बीड हे जिल्हे सर्वाथानी मागासलेले दिसतात. नैसर्गिक परिस्थिती योग्य न लाभल्यामुळे शेतकरीवर्गात दारिद्र्याचे प्रमाण अधिक परिणामी शिक्षणाचे प्रमाण फार कमी दिसते.(११)

संस्थानातील आर्थिक व्यवस्था स्वतंत्र स्वरूपाची होती. दळणवळण पोष्ट इत्यादींचा कारभार या संस्थानात स्वतंत्र होता. शेती हा मुख्य व्यवसाय या संस्थानात असला तरी राज्याच्या खजिन्यात कर अत्यल्प प्रमाणात येत होता. कारण शेती कोरडवाहू व कमी पावसाच्या प्रदेशात होती. औद्योगिकरणाचा अभाव होता. जमीनदारांचा विभाग

म्हणून या विभागाकडे पाहिले जात असले तरी शेतमजूरीवर पोट भरणारी जनता बहुसंख्य होती. मराठवाडा मागासलेला आहे हे एक न नाकारता येणारे सत्य आहे. (१२)

हैद्राबाद संस्थानात राज्य हे निजामाच्या कायद्यानुसार चालत असे. सालारजंग हा प्रधानमंत्री असताना त्याने शासन यंत्रणा कार्यक्षम बनविण्याचा प्रयत्न केला. संस्थानातील राजकीय विकासाच्या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने २० व्या शतकाच्या प्रारंभास सुरुवात झाली. या काळात झालेल्या अनेक घटनात्मक सुधारणा, लोकांची वाढती जागृती, संस्थानाबाहेरील खिलाफत चळवळ या व इतर घटकांचा परिणाम राजकीय विकासावर पडलेला दिसतो. गुलामगिरीच्या गर्तेत बुडालेल्या समाजाला वर काढण्यासाठी त्यांना गुलामगिरीची जाणिव करुन देणे महत्वाचे ठरते. (१३) ही जागृती करण्यासाठी आवश्यक असलेले नागरिक हक्क ते जनतेला मिळू नयेत यासाठी सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. संस्थानात वर्तमानपत्रे काढण्यास बंदी होती. एवढेच नव्हे तर बाहेरुन येणाऱ्या वर्तमानपत्रावर बंदी होती. राजकीय संघटना निर्माण करण्यास बंदी होती. सभा सम्मेलनाला बंदी होती. परंतु ग्रंथालयाच्या चळवळीने केशवराव कोरटकरांनी त्यास खिंडार पाडले. (१४)

हिंदू-मुस्लीम एकत्र येवू नयेत याबाबत निजामाने खबरदारी घेतली होती. खिलाफत चळवळीच्या संदर्भात मोर्चे काढण्यास बंदी घालणारे एक फर्मान निजामाने काढले होते. (१५)

राजकीय कार्यक्रमाना सरकारची पूर्वसंमती घेणे गरजेचे होते. निजामाने स्विकारलेल्या या भूमिकेमुळे उलटा परिणाम झाला. लोकांमध्ये संघटीत होण्याची वृत्ती वाढली. निरनिराळ्या संघटना त्यामुळे स्थापन झाल्या. त्यांच्या बैठका संस्थानाबाहेर होवू लागल्या. १९१९ ते १९३१

या काळात हैद्राबाद संस्थानात अनेक घडामोठी झालेल्या दिसून येतात. निजामाच्या राजवटीत लोकांना राजकीयदृष्टीने जागृत करता येवू नये यासाठी सभा-सम्मेलने मिरवणूकींना बंदी घालणारा "गश्ती निशाण ५३" या नांवाने ओळखला जाणारा काळा कायदा १९२९ मध्ये अंमलात आला. तत्पूर्वी १९२१ च्या कायद्याने बरेच नागरी हक्क संकुचित केलेले होते. १९२९ च्या कायद्याने तर नागरिकांच्या सर्व हक्कावर गदा आली होती.(१६)

सहाजिकच या कायद्याला विरोध करण्यासाठी चळवळी सुरू झालेल्या दिसतात. १९३१ साली अकोला येथे झालेल्या बैठकीत संस्थानात जबाबदार शासन पध्दती असावी, जनतेला नागरी स्वातंत्र्य असावे असे ठराव मंजूर करण्यात आले.(१७)

१९३५ मध्ये हैद्राबाद मधील सर्व जातीच्या लोकांनी " निजाम सब्जेक्ट लीग " या नावाची संघटना स्थापन केली. १९३७ मध्ये आंध्र प्रादेशिक परिषदेची पहिल्यांदाच बैठक झाली. १९३७ साली कर्नाटक व मराठवाडा परिषदेच्या कार्यास सुरुवात झाली. मराठवाडा परिषदेचे पहिले अधिवेशन परतूर येथे गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली झाले.(१८) त्यांच्याच नेतृत्वाखाली स्टेट कॉंग्रेसचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी सत्याग्रह करावा लागला. या तुकडीचे त्यांनीच नेतृत्व केले. पुढे स्टेट कॉंग्रेसचे तेच अध्यक्ष झाले.(१९) सामान्यत: १९३१ ते १९३७ या कालखंडात संस्थानातील राजकीय वातावरण बदलत चाललेले दिसते.

केशवराव कोरटकरांनी १९२२ साली सुरू केलेल्या ग्रंथालय चळवळीने देखील लोकांच्यामध्ये राजकीय जागृती मोठया प्रमाणात केल्याचे

दिसून येते.(२०) या सर्व परिस्थितीचे मूळ कारण म्हणजे शिक्षणाची दुरावस्था हे मर्म ओळखूनच रामानंद तिर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, मराठा व तत्सम जातीचे शिक्षण प्रसारक मंडळातील आण्णासाहेब गव्हाणे, उध्दवराव पाटील यासारख्या नेते मंडळीने बहुजन समाजाला शिक्षणाची व्दारे खुली केली. त्यातुनच लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. लोकांना आपल्यावर होणा-या अन्यायाची जाणीव होवू लागली. याच दरम्यान संस्थानाबाहेर होणा-या चळवळीचेही परिणाम संस्थानातील जनतेवर होवू लागले होते. विशेषत: गांधीनी सुरु केलेल्या राजकीय चळवळीचा प्रभाव संस्थानातील जनतेवर व नेत्यावर मोठया प्रमाणावर होवू लागला. संस्थानातील राज्यकर्ते हिंदुना योग्य प्रकारची वागणूक देत नसल्याने हिंदू-मुस्लीम दंगली मोठया प्रमाणात होवू लागल्या.(२१)

हिंदुना आपले हक्क प्रस्थापित करावेत असे वाटू लागले. तत्कालीन नेत्यांनी अत्यंत धूर्तपणे या लढयाचे स्वरुप हिंदू-मुस्लीम असे न राहील हे पाहून त्यांनी नागरी स्वातंत्र्य या मागणीसाठी लढा चालविला. त्यातून जनतेची बाजू घेवून लढणा-यात आर्य समाज आघाडीवर होता. सरकारने सर्व बाजूनी चालविलेल्या जुलमाची ती प्रतिक्रिया होती. खेडयापाडयातील लढावू वृत्तीचे लोक आर्यसमाज पंथात सामील झाले.(२२) अर्थात आर्यसमाजाची चळवळ ही राजकीय चळवळ न बनता धार्मिक पुनरुज्जीवनाची चळवळ ठरली. मात्र या चळवळीने लोकांत जागृती निर्माण केली. दरम्यान मुस्लीमाकरिता इतेहादूल मुसलमीन या जमातवादी संघटनेचा उदय झाला.(२३)

महाराष्ट्र परिषदेच्या निमित्ताने लोकांना निदान व्यासपिठ प्राप्त झाले. लोक अन्यायाचा प्रतिकार करण्याची भाषा

बोलू लागले. महाराष्ट्र परिषदेतूनच पुढे स्टेट काँग्रेसची निर्मिती झाली.(२४) एकंदरीत संस्थानातील राजकीय विकासात विविध संघटनानी हातभार लावलेला दिसतो. अर्थात हैद्राबाद स्टेट काँग्रेस व साम्यवादी पक्ष हे राजकीय ध्येय साध्य करण्यासाठीच स्थापन झालेले होते. सरंजामदारीमुळे लहान शेतक-यांची वाईट अवस्था झाली होती.(२५) सावकारीला जोर चढला होता. गरिब शेतकरी सावकाराच्या कर्जात बुडाला होता. त्याला वर काढण्यासाठीच हैद्राबाद काँग्रेस अंतर्गत कार्य करण्यास शेतकरी संघ आण्णासाहेब गव्हाणे, उध्दवराव पाटील यांच्यासारख्या नेते मंडळीच्या नेतृत्वाखाली कार्यरत होता. त्यांच्यावर कार्लमार्क्सचा व लेनिनचा प्रभाव असल्यामुळे हैद्राबाद मुक्ती संग्रामानंतर या गटाला काँग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामगार पक्षाचा आधार घ्यावा लागला.(२६)

हैद्राबाद संस्थानात हिंदूना सामाजिक परिस्थिती पोषक नव्हती. निजामाचे मुसलमान धार्जिणे धोरण, सर्व राजकीय सत्ता मुसलमानांच्या हाती त्यामुळे हिंदूची मोठीच कुंचबणा होत होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी संस्थानात राजकीय चळवळीला जोर चढला. अर्थात त्यालासुध्दा भारतातील तत्कालीन परिस्थिती कारणीभूत होती असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.

## १.२ मराठवाडयातील शेतक-यावरती निजाम राजवटीत होणारे जुलूम

निजामी रावट म्हणजे सरंजामदाराची राजवट असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. निजामी राजवटीत जमीनदार व वतनदार लोक बरेच होते. त्यांचा निजाम राजवटीला पाठींबा होता.

निजामाचा वरदहस्त संरजामदार वर्गावर होता. त्यांच्या मदतीनेच सामान्य जनतेवर निजाम अन्याय जुलूम करीत असे. हैद्राबाद संस्थानात सरंजामदारी पध्दती मोठया प्रमाणात होती. मोठे शेतकरी व लहान शेतकरी अशी वर्गवारी होती. जमीनदार हे कुठल्याच प्रकारचे कष्ट न करता गरीब शेतक-यांची पिळवणूक करीत होते. कुळांना कुठल्याचप्रकारचे संरक्षण नव्हते. कुळांना त्यांच्या कष्टाचा अत्यंत कमी मोबदला दिला जात असे व जमीनदार जास्त मोबदला घेत असे. त्यामुळे कुळांची स्थिती बिकट होती फक्त त्यांनी जनावरासारखे राबावयाचे एवढे एकच त्यांचे हाती होते. (२७)

संस्थानात १९३७ साली महाराष्ट्र परिषद ही सामान्य जनतेवरील अन्याय दूर करण्यासाठी स्थापन करण्यांत आली होती. १९३७ ते १९४६ तिची झालेली अधिवेशने पाहिली तर शेतक-यावरही निजाम राजवटीत कोणते जुलूम होत होते त्याचा पाढा वाचलेला दिसून येतो. गोविंदराव नानल पासून ते आ. कृ. वाघमारे या महाराष्ट्र परिषदेच्या अध्यक्षानी शेतक-यांच्या प्रश्नांची आत्यंतिक जिव्हाळ्याने दखल घेतली असल्याचे दिसून येते. (२८)

गोविंदराव नानल यांनी शेतकरी संख्येने जास्त असून शिवाय सर्वाज जास्त कर देणार असून तो सर्वात जास्त उपेक्षित आहे. शेतकरी आज अपादमस्तक प्रचंड कर्जात बुडाला आहे असे वर्णन करुन त्याला सावकारशाहीतून मुक्त करण्यासाठी सहकार व्यवस्थेचा पुरस्कार करावा असे सुचविले आहे. (२९)

काशीनाथ वैद्य हे महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांनी शेतक-यांच्या कर्जबाजारीपणाचे मोठे विदारक चित्र रेखाटले आहे.

जमीनतारण बँकाचा कायदा सुधारून अंमलात आणावा, पुरेसे भांडवल द्यावे व वाढीव तगाई द्यावी असे पर्याय सुचविले . रोहीले आणि अरब यांच्या जुलमी सावकारशाहीचा निर्देश केला. शेतसारा कमी करण्याची त्यांनी मागणी केली. खालशाच्या तुलनेत सर्फेखास पायगा व जहागीर या भागातील शेतसारा भरमसाट आहे तो खालशाच्या बरोबरीने आणण्याची निकड वर्णन केली आहे.(३०)

महाराष्ट्र परिषदेचे चौथे अध्यक्ष श्रीधर नाईक यांनी शेतकी व शेतकरी यांचा प्रश्न हाताळला. अन्नधान्याच्या प्रश्नासंबंधी त्यांनी धान्य व कापडाचे साठे नोंदवावेत, सबसीडी देवून धान्य व कापड स्वस्त दरात विकावीत, स्वस्त धान्याची दुकाने काढावीत अशा सूचना केल्या आहेत. अन्नधान्याच्या किंमती वाढल्या हे खरे परंतु त्या शेतक-यांच्या पदरात न पडता मधले दलालच खावून टाकतात.(३१)

पांचव्या व सहाव्या परिषदेचे अध्यक्ष बिंदू व वाघमारे यांनी शेतक-यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न हाताळला आहे. त्यांनी भस्त्या रिपोर्टचा उल्लेख केला असून रोहीले व अरब यांच्या अत्याचारी सावकारशाहीच्या विरूध्द सरकार कांही एक करीत नाही उलट त्यांना प्रोत्साहन देते अशी टीका केली.(३२)

बिंदू व वाघमारे यांनी अन्नधान्याचे भाव शेतक-यांना वाढवून द्यावेत अशी मागणी केली होती. वैद्य यांनी कुळ कायद्याचा उल्लेख करून कुळांना संरक्षण देण्यावर भर दिला. शेतीला जोडून शेतक-यांना जोडधंदे उपलब्ध करून देण्याची गरज बहुतेकांनी बोलून दाखविली. वेठबिगार आणि कर्ज निवारण यासाठी कायदे करावेत व

त्यांचा कटाक्षाने अंमल करावा ही गोष्ट भर देवून सांगितलेली दिसते. भांडवलशाहीच्या जोडीला सरंजामदारी लाभली आहे. ज्यामध्ये बहुजन समाजाच्या कल्याणाची सोय नाही अशा रचनेला आम्ही स्वातंत्र्य म्हणू शकणार नाही असे बिंदू म्हणतात.(३३)

संस्थानात अल्प भू-धारकाचे फार हाल होते. निसर्गावर शेती अवलंबून असल्याने तो सतत कर्जबाजारी बनलेला दिसतो. कर्जापोटी त्याला जमीन एकतर सावकाराकडे गहाण ठेवावी लागते किंवा विकावी लागते. त्यामुळे लहान शेतकरी भूमीहीन होत होता व त्यामुळे शेतमजूरांच्या संख्येत भर पडत होती. ग्रामीण भागात दोनच गट होते एक बडया जमीनदारांचा आणि दुसरा भूमीहीन शेतक-यांचा. जमीदारांची संख्या जरी कमी होती तरी त्यांच्या मालकीच्या जमिनी खूप होत्या. शेतमजूरानां त्यांच्या शेतावर मजूर म्हणून राबावे लागे. सरंजामदाराना निजामाचे अनियंत्रीत सहायू होते.(३४)

लेव्हीचा प्रश्न खूपच उग्र बनला होता. युध्दामुळे धान्य गोळा करणे व रेशानिंग करणे सरकारला भाग होते. लेव्हीसाठी निजाम सरकारने खेडयापाडयातील शेतक-याला दावनीला धारले व खूप अत्याचार केले. लेव्ही एवढया भरमसाठ प्रमाणावर वसुल केली जात होती की , शेतक-यापाशी कांहीच शिल्लक रहात नव्हते. पुष्कळ प्रकरणी तर शेती पिकली नसली तरी विकत घेवून लेव्ही द्यावी लागत असे. यातून छोटे मोठे अनेक संघर्ष उडाले. महाराष्ट्र परिषद या प्रश्नी खूपच क्रियाशील राहिल्याचे दिसते. ज्यांची शेती पिकली आहे अशाकडून लेव्ही घ्यावी व ती घेतांना त्या शेतक-यापाशी वर्षभराच्या गरजेपुरते धान्य राहील याची खबरदारी घ्यावी अशी सूचना अनेकांनी केली. ज्यांची शेती मोठी त्यांच्याकडून लेव्ही जास्त व छोटया शेतक-याकडून कमी असे प्रमाण सुचविण्यांत आले.(३५)

कुळांना संरक्षण देणारा कायदा करण्याची मागणी उमरी अध्यक्षाच्या भाषणातून व लातूर अधिवेशनाच्या ठरावातून व्यक्त झाली. लातूरला कुळ कायद्याचा स्वतंत्र ठरावच झाला. पुढे जो कुळ कायदा झाला त्याचे मूळ लातूरच्या ठरावात शोधता येते. हा कायदा पुष्कळच पुरोगामी होता असे म्हटले जाते.(३६)

लेव्हीचे धोरण, धान्य वसुली याबाबतीतजी पध्दत अवलंबीली जात होती त्यामुळे खेड्यातील शेतकऱ्यांचा अनन्वीत छळ चालला होता. पोलीसांच्या जबरदस्तीने धान्य वसुली केली जात होती. एकंदरीत निजाम राजवटीत शेतकऱ्यावर फार मोठा जुलूम केला जात होता. (३७)

## १.३ हैद्राबाद स्टेट काँग्रेस आणि हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामची चळवळ :

निजाम राजवटीत हिंदूच्यावर मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचर होत होते. मुस्लीमांना मानाचे स्थान निजामी राजवटीत प्राप्त झाले होते. नागरी हक्क मिळाल्याशिवाय हिंदूना चांगले स्थान प्राप्त होणार नाही याची जाणीव तत्कालीन नेत्यांना झाली. त्यातूनच प्रांतिक परिषादाची निर्मिती झाली. पहिली प्रांतिक परिषाद तेलंगणातील ग्रंथालय चळवळीचे प्रवर्तक आंध्र पितामह माडपाटी हनुमंतराव यांनी आंध्र परिषादेची स्थापना करण्यांत पुढाकार घेतला.(३८)

आंध्र परिषादेच्या कार्यापासून स्फूर्ती घेवून मराठवाड्यात महाराष्ट्र परिषादेची स्थापना झाली. पहिले अधिवेशन परतूर येथे झाले. या परिषादेची १९४६ पर्यन्त सात अधिवेशन झाली. स्थानिक प्रश्नांच्या चर्चेपासून ते जबाबदार शासन पध्दतीच्या मागणीपर्यन्त या परिषादेने

सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येते. निजामाने आपल्या मुलुखात राष्ट्रवाद जन्माला येणार नाही याचा मोठया प्रमाणात खटाटोप चालविला. याबाबतीत निजामाला ब्रिटीश सत्तेचे पाठबळ मिळाले होते.(३९) महाराष्ट्र परिषदेच्या कार्यातूनच पुढील काळात कॉंग्रेसचे नेतृत्व जोपासले गेले.(४०)

संस्थानातील नागरी स्वातंत्र्याची गळचेपी हे या धोरणाचाच परिपाक होता. १९३७ मध्ये हरिपूर येथे झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात संस्थानी प्रजेने स्वत:च्या बळावर आपले लढे लढवावेत असा आदेश दिला. निजामाच्या दडपशाहीमुळे निचेष्ट पडलेल्या लोकसागरावरील लहान मोठी वादळे निर्माण करण्याचे कार्य महाराष्ट्र परिषद, कर्नाटक परिषद, निजामस् सब्जेक्टस लीग व हैद्राबाद पिपल्स कन्व्हेन्शन या संघटनानी केले.(४१) या प्रयत्नातूनच पुढे निजामी सत्तेला आव्हान देणारी स्टेट कॉंग्रेस ही संघटना १९३८ साली निर्माण झाली. २९ जानेवारी १९३८ ला भरलेल्या कांही कार्यकर्त्यांच्या बैठकीत असे ठरले की, हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस नावाची राष्ट्रवादी दृष्टीकोन असणारी एक राजकीय संघटना स्थापन करण्यांत यावी.(४२)

१९३८ मध्ये झालेल्या बैठकीतच एक अस्थायी समिती स्थापन केली. सभासद नोंदणी व इतर आवश्यक कार्य या समितीकडे सोपविले. १९३८ ला स्थापन झालेल्या अस्थायी समितीने १९३८ च्या ऑगष्ट महिन्यात स्टेट कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाची व उद्दिष्टांची लोकांना माहिती व्हावी म्हणून एक पत्राक काढण्यांत आले. त्या पत्राकात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने पुढील उद्दिष्टावर भर दिला होता. निजामाच्या छत्राखाली जबाबदार राज्यपध्दतीची स्थापना, सर्व जातीजमातीचे ऐक्य, राष्ट्रीय शक्तीची संघटना आणि ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी सनदशीर मार्गांचा अवलंब करणे. जातीजमातीत कटुता निर्माण न करता राष्ट्रीय भावना बळकट करण्यासाठी नागरिकांनी स्टेट कॉंग्रेसचे सभासद व्हावे अशी

विनंती करण्यांत आली.(४३)

९ सप्टेंबर १९३८ मध्ये पदाधिका-यांची निवड होणार होती. परंतु ७ सप्टेंबर १९३८ रोजी सरकारने एक हुकूम काढून संघटना जन्माला येण्यापूर्वीच बंदी घातली. सरकारचा आरोप काँग्रेस या शब्दावर होता. शिवाय संघटनेचा संबंध संस्थानाबाहेरील संघटनेशी नसावा. संघटना जातीयवादी आहे असे निजामाचे मत होते. या निर्णयाचे महात्मा गांधीना आश्चर्य वाटले व त्याबाबत गांधीनी १७ सप्टेंबरच्या हरिजन अंकात टिका केली होती.(४४)

What was Gandhiji's criticism should have been quoted.

सरकारच्या या निर्णयाविरुध्द स्टेट काँग्रेसने चळवळ संघटीत करण्याचा निर्णय घेतला. १९३८ च्या ऑक्टोबरमध्ये स्टेट काँग्रेसने आपल्या अस्तित्वासाठी रणशिंग फुंकले. जुलमी सत्तेला प्रथमच जनतेने संघटीत आव्हान दिले होते. (४५) सिव्हील लिबर्टीज युनियन, आर्यसमाज, हिंदू महासभा या संघटनानी चळवळीत हिरीरीने भाग घेतला. हैद्राबादमधील सर्व तुरुंग सत्याग्रहीनी भरुन गेले.(४६) ही चळवळ सुरु होण्याच्या दरम्यान सरकारला आणखी एका संकटाला तोंड द्यावे लागले. " वंदे मातरम् " हे गीत सरकारने विद्यापीठाच्या वस्तीगृहातून गाण्यास बंदी घातली. त्यामुळे उस्मानिया विद्यापीठाच्या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठावर बहिष्कार घातला.(४७)

मराठवाड्यात जवळ जवळ सर्वच भागात याचप्रकारची कृती घडली. या गीतामुळे मुस्लीमांच्या भावना दुखावतात असे सरकारचे मत होते. विद्यार्थ्यांनी शिक्षण संस्थावर बहिष्कार घातल्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित व्हावे लागले. बरेच विद्यार्थी नागपूर, जबलपूर येथे जावून परिक्षा देवून आले. औरंगाबाद पासून सुरु झालेली ही चळवळ

जवळजवळ सर्वच शिक्षण संस्थात पसरली. या चळवळीचे नेतृत्व गोविंदभाई श्रॉफनी केले. त्यांना मराठवाडयातील इतर नेत्यांनी सहाय्य केले. असंख्य विद्यार्थी व कार्यकर्ते स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले. ही चळवळच पुढे हैद्राबाद मुक्ती संग्रामास वरदान ठरली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय वृत्तीच्या शक्तीशी दिलेली साथ म्हणजे हैद्राबाद आंदोलनाच्या इतिहासातील एक अत्यंत सुंदर प्रकरण होय.(४८)

१९३८ च्या चळवळीनंतर हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसला संघटनात्मक आकार येत होता. स्वातंत्र्य प्राप्ती हे संघटनेचे मुख्य ध्येय होते. जातीयवादापासून संघटनेला अलिप्त ठेवण्यात संघटनेच्या नेत्याला यश आले होते. जबाबदार शासन पध्दती व नागरी स्वातंत्र्य या प्रमुख मागण्या स्वातंत्र्यपूर्व काळात स्टेट कॉंग्रेसने केल्या होत्या. १९३८ च्या डिसेंबरमध्ये स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह स्थगित झाला. एप्रिल १९३९ मध्ये स्टेट कॉंग्रेसच्या सर्व सत्याग्रहींची सुटका करण्यांत आली. पुढे वर्षभराने वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरु करण्यांत आली. स्वत: गांधी सत्याग्रहींची निवड करीत.(४९)

१९४२ चा लढा भारतात सुरु झाला परंतु त्याचा संस्थानातील वातावरणात फारसा बदल घडला नाही. १९४२ ची चळवळ हैद्राबाद संस्थानात फारशी मुळ धरु शकली नाही. १९४२ च्या सप्टेंबरच्या प्रसिध्द झालेल्या पुढाऱ्याच्या एका पत्राने राजकीय आघाडीवर बरेच वादळ निर्माण झाले. ब्रिटीश सत्तेपासून हैद्राबाद आझाद व्हावे व नंतर लोकानुवर्ती राजवट या ठिकाणी चालू रहावी या आशयाचे हे पत्रक होते. ब्रिटीश सत्तेपासून मुक्ती हे निजामाला पटण्यासारखो असले तरी लोकानुवर्ती राज्यकारभार निजामाला पटण्या-

सारखी नव्हते.(५०)

१९३८ ते १९४६ या कालखंडात गोविंदराव नानल हे स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष होते.(५१) ग्वाल्हेर येथे नेहरूंच्या अध्यक्षतेखाली स्टेटस् पिपल्स कॉन्फरन्सचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात हैद्राबाद विषयीचा ठराव स्वत: नेहरूंनी तयार करून त्यामध्ये निजामाचा तीव्र शब्दात निषेध केला.(५२) पुढे स्टेट कॉंग्रेसवरील बंदी १९४६ मध्ये उठविण्यांत आली. या बदललेल्या परिस्थितीत महत्वाचे कार्य होते ते म्हणजे तिन्ही प्रांतिक परिषदांचे एकत्रीकरण करून त्या स्टेट कॉंग्रेसमध्ये विलीन करणे हे होते. महाराष्ट्र परिषदेचे शेवटचे अधिवेशन लातूर येथे होते. या अधिवेशनात जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करणारा ठराव व महाराष्ट्र परिषद स्टेट कॉंग्रेसमध्ये विलीन करावी हे दोन ठराव मंजूर करण्यांत आले. आंध्र महासभेच्या राष्ट्रीय शाखेने अशाचप्रकारचा ठराव मंजूर केला होता. कर्नाटक परिषदेने अशाच एका अधिवेशनात अशाप्रकारचा ठराव मंजूर केला होता. या तिन्ही परिषदांचे विलीनीकरण ही स्टेट कॉंग्रेसच्या कार्याची पहिली पायरी होय. श्री गोविंदभाई श्रॉफ यांचेकडे स्टेट कॉंग्रेसची घटना तयार करण्याचे काम सोपविले. माडपाटी रामचंद्ररावम् यांना सेक्रेटरी केले तर स्वामी रामानंद तिर्थ यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यांत आली होती.(५३)

Nehru should have been quoted.

१५ ऑगष्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतात सामील न होता स्वतंत्र राहण्याची घोषणा निजामाने केली. ही घोषणा हैद्राबादच्या जनतेला मोठे आव्हान होते.(५४) निजामाने जैसे थे कराराचा घोळ घातला, १२ एप्रिल १९४८ ला काशीम रझवीने पुढील वल्गना केली, "बंगालच्या उपसागराच्या लाटा आमच्या सर्व सत्ताधीशांचे चरण प्रक्षालन करण्यांस येतील तो दिवस फार दूर नाही " इतकेच नव्हे तर दिल्लीच्या

लाल किल्ल्यावर आपण आसफजाही झेंडा नेवून रोवू असे म्हणण्यापर्यन्त त्याची मजल गेली होती.(५५) निजाम सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य नबाब अलीयावर जंग यांनी असे म्हटले होते, " मुसलमानाना हैद्राबादचे विलीनीकरण सहन होणार नाही व मग ते मुसलमान जी दंगल सुरू करतील ती अनावर होवून सर्व जिल्ह्यात पसरेल." (५६)

काशीम रझावी आपल्या शस्त्र सामर्थ्यांचा खूपच गवगवा करीत होता. इस्लामी राज्याचे उद्दिष्ट साध्य होईपर्यन्त मुसलमानानी आपल्या तलवारी म्यॅन करू नयेत. शत्रूचा नि:पात करण्यासाठी एका हातात तलवार व एका हातात कुराण घेवून मुसलमानानी आगेकूच केली पाहिजे, असे सांगून तो मुसलमानाना भडकावीत होता.(५७) १९४७ च्या नोव्हेंबरमध्ये जैसे थे करार निजामाबरोबर करण्यात मेनन यांना यश आले. अर्थात हा करार एक वर्षापुरता मर्यादित होता.(५८)

स्वामी रामानंद तिर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची संघटनात्मक व वैचारिक वाढ जोमाने झाली. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर गांधी नेहरूंच्या विचारांचा फार मोठा पगडा होता. त्यामुळेच संस्थानातील चळवळ शांततामय मार्गाने व सत्याग्रहाच्या स्वरूपाने सुरू झाली. संघटनेच्या महत्वाच्यावेळी गांधी नेहरूंचा सल्ला महत्वाचा मानला जाई.(५९) देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्टेट कॉंग्रेसच्या चळवळीला जोर चढला. निजामाने सुरूवातीला विलीनीकरणाच्या करारावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यामुळे स्टेट कॉंग्रेसला विलीनीकरणाची चळवळ सुरू करणे भाग पडले. काशीम रझावीच्या इतेहादूल संघटनेने विलीनीकरणास विरोध केला.

हैद्राबाद संस्थानात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुरू झालेल्या मुक्ती लढयाला आवर घालण्यासाठी निजामाने काशीम रझावीच्या

नेतृत्वाखाली प्रयत्न चालविले होते. निजामाने त्याला पैसा व हत्यारे देवून राजकीय निमलष्करी संघटना उभी केली. संस्थानातील पोलीस व रझाकार यांचेकडून सामान्य जनतेवर जुलूम होवू लागला.(६०)

भारत सरकार व निजाम यांच्यात होणाऱ्या वाटाघाटी-मध्ये रझावीने वारंवार अडथळे आणले. मीर लियाकत अली हा पंतप्रधान व कार्यकारी मंडळातील आठ सदस्यापैकी चार मुस्लीम व तीन हिंदू सदस्य रझावीचेच समर्थन करणारे होते. फक्त रामाचारी हे विरोधी मताचे होते. त्यामुळे रझावीच्या निमलष्करी दलास मोठया प्रमाणात मदत मिळत होती. लियाकत अली मंत्रीमंडळाची नियुक्ती म्हणजे रझाकार प्रमुख काशीम रझावी यांच्या वाढत्या वर्चस्वावर चढलेला कळसच होय.(६१)

साम्यवादी पक्षाने निजामाला मदत करण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्यांच्यावरील बंदी उठविण्यात आली असे मत के, एम, मुन्शी यांनी आपल्या निरीक्षणानंतर व्यक्त केले. याच विधानाला स्वामी रामानंद तिर्थांनी पाठींबा दिल्याचे पुढील विधानावरून दिसते." कम्युनिस्टांनी राजकीय स्वातंत्र्याचा मुख्य प्रश्न डावलणाऱ्या व त्याला प्रतिकूल असणाऱ्या पंथीय चळवळी सुरू केल्या. हे पाहून समितीला खेद होतो. " असे रामानंद तिर्थांनी म्हटले. एवढेच नव्हे तर कम्युनिस्टानी आपल्या राजकीय असहिष्णूतेमुळे निजामाच्या एकतंत्री राजवटीविरूध्द जीवनमरणाचा लढा देत असलेल्या स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यावर हल्ला केला त्यांना मारहाण केली. स्वातंत्र्य सैनिकावर असे हल्ले होणे ही अत्यंत दुर्दैवी घटना होय.(६२)

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शस्त्राच्या मदतीने निजामाच्या राजवटीतील गावे मुक्त करण्याचा कार्यक्रम हाती

घेतला. संस्थानात स्टेट कॉंग्रेस, इतेहादूल मुसलमीन व साम्यवादी पक्ष यांच्या कार्यामुळे स्थिती बिकट बनत चालली आहे. स्टेट कॉंग्रेस व रझाकार यांच्यातील संघर्षामुळे वातावरण भितीदायक बनत होते. स्त्रियांची अब्रु घेणे, लूटमार करणे हे प्रकार वाढत गेले. या उध्दवरावांच्या मताशी रामानंद तिर्थ सहमत असल्याचे दिसते.(६३)

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये दोन प्रवृत्ती वास करीत होत्या. एक स्वामी रामानंद तिर्थ, गोविंदभाई श्रॉफ आदींचा गट तो सत्याग्रहाच्या चळवळ तंत्रापासून सशस्त्र लढयापर्यन्त प्रामाणिकपणे लढत होता. बी. रामकृष्णराव, काशीनाथराव वैद्य आदींचा गट अंगचोरपणा आणि राजकीय टगेगीरी करीत फिरत होता.(६४) त्यापैकी आण्णासाहेब गव्हाणे यांच्या नेतृत्वाखालील मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकर्ते हा शेतकरी संघ नांवाने ओळखला जात असे. रझाकारांच्या जुलूमाचा प्रतिकार करण्यासाठी या गटातील लोक सैनिक शिबीरात दाखल झाले.(६५) आण्णासाहेब गव्हाणे, नरसिंगराव देशमुख, उध्दवराव पाटील यांनी पूना, बडोदा ,गोवा येथून हत्यारे मिळवून सोलापूर जिल्हयातील सरहद्दीवर व नगर जिल्हयातील सरहद्दीवर कॅम्प काढले.(६६)

मराठवाडयामध्ये मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाचा प्रभावी ग्रुप हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये काम करू लागला होता. परंतु या मंडळाचे व स्वामी रामानंद तिर्थ ,बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ यांच्याशी मतभेद असल्यामुळे कॉंग्रेस अंतर्गत स्वतंत्र कॅम्प दोन्ही गटाचे असत.(६७)

सोलापूर व नगरच्या सरहद्दीवर मराठा व तत्सम जातीचे शिक्षण प्रसारक मंडळाचे लष्करी कॅम्प चालविले जात. सोलापूर कॅम्पचे नेतृत्व

उध्दवराव पाटील व नरसिंगराव देशमुख करीत होते. तर नगर कॅम्पचे नेतृत्व आण्णासाहेब गव्हाणे व खुशालराव मोताळे करीत होते. या गटाचा पत्री सरकारमधील (प्रति सरकार) क्रांतीसिंह नाना पाटील व भाई बापूसाहेब लाड यांच्याशी सहकार्याचे संबंध होते. स्वत: लाड यांनी आपले पट्टीचे २५-३० कार्यकर्ते सैनिक सोलापूर व नगरच्या कॅम्पच्या मदतीसाठी पाठविले होते. त्यांनी स्वत:ही या कारवाईत भाग घेतला होता.(६८)

हैद्राबाद मुक्ती संग्रामातील लढयातील उध्दवरावांचा सहभाग धाडशी व अलौकीक म्हणावा लागेल. रझाकारांचे ठाण्यावर हल्ले चढविणे, सारा लुटून आणणे ही धाडशी कामे करण्यात त्यांचा पुढाकार असे. बॉंब टाकण्याचा किंवा गोळीबार करण्याचा प्रसंग असो उध्दवराव आघाडीवर असत.(६९) बार्शी लातूर रेल्वे मार्गावरील सेंदरी येथील प्रसंग तर उध्दवरावांच्या आयुष्यातील बिकट असा प्रसंग होता. रझाकारांचा एक तांडा सेंदरी रेल्वे फाटयावरून चालला होता. उध्दवरावांनी व त्यांच्या एका सहकारी मित्राने अगदी १०० ते १२५ यार्डावरून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. त्या वर्षावाचा वेग एवढा प्रचंड होता की, अनेक बंदूका आग ओकीत आहेत, आता धाडगत नाही असे समजून रझाकार पळत सुटले, त्यांना माघारी पाहण्याचे भान राहिले नाही.(७०)

पुढेही ही पार्टी पिंपरीच्या पंडीतराव पाटलांच्या वाडयांत आश्रयाला होती. या वाडयावर रात्री सतत फायरींग करण्याचे, हातबॉंब टाकण्याचे काम उध्दवरावाच्या मदतीने चालले होते. शेवटी पोलीस पार्टी वैतागून गेली, नंतर ती परांडयाला निघून गेली.(७१) उध्दवराव पाटलाच्या गटाकडून चाललेल्या या कार्याला फूलचंद गांधी व बाबासाहेब परांजपे यांच्या गटाने नेहमीच अडचणी उभ्या केल्या. मोरारजी देसाईकडून डी.एस.पी. सोलापूर यांना उध्दवरावांच्या कॅम्पवर नजर ठेवण्याच्या सूचना

मिळाल्या. हा गट गुंडगिरी करतो, लुटालूट करतो असे खोटे आरोप त्यांचेवर ठेवून त्यांचा कॅम्प बंद पाडण्याचा प्रयत्न फूलचंद गांधीनी त्यांच्या नेत्याच्या मदतीने केला. पोलीस कारवाई होण्याअगोदर चार पांच दिवस आधी त्यांच्या गटाची हत्यारे डी.एस.पी. सोलापूर यांनी काढून घेतली.[७२]

स्टेट काँग्रेसमधीलउच्चभ्रु गटाच्या नेतृत्वामुळेच बहुजन समाजातील वर्ग हा शेतकरी संघ या नांवाने कार्यरत राहीला. स्टेट काँग्रेसमध्ये उच्चभ्रु लोकांचे नेतृत्व होते. शेवटी भारत सरकारने संस्थानात सैन्य पाठविण्याचा निर्णय घेतला. सैन्य संस्थानाच्या तिन्ही बाजूने आंत घुसले. अवघ्या तीनच दिवसांत निजाम शरण आला.[७३] हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. प्रशासनाची जबाबदारी केंद्र सरकारने घेतल्यानंतर हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा लढा थांबवला गेला. स्टेट ■ काँग्रेसचे पुढे राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विलीनीकरण झाले.

## १.४ हैद्राबाद चळवळीतील विचारप्रवाह :

हैद्राबाद मुक्ती संग्रामाची चळवळ सुरु होत असताना अनेक विचारप्रवाह हैद्राबाद संस्थानात कार्यरत होते. त्यापैकी ज्यांनी मुक्ती संग्रामात कार्य केले अशा संघटनांचा विचार करणे गरजेचे आहे. आर्यसमाज, गांधी, नेहरु यांची छाप असणारी स्टेट काँग्रेस व सत्यशोधक समाजाच्या पोटातून हळूहळू निर्माण होणारा समाजवादी विचाराचा मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाचा शेतकरी संघ इत्यादीचा प्रामुख्याने विचार करावा लागेल.

(१) आर्यसमाज :

संस्थानातील जनतेच्या धार्मिक व प्रतिकार भावना यांची जोपासणा करण्यासाठी आर्यसमाजाचे श्रेय मोठे होते. संस्थानातील मुस्लीम राज्यकर्त्यांचे विरोधात जनमत संघटीत करण्याचे काम १९३५ नंतर आर्यसमाजाने फार प्रभावीपणे केले. हैद्राबाद संस्थानात आर्यसमाजाची स्थापना १८९२ साली हैद्राबाद येथे झाली. न्या. केशवराव कोरटकर कित्येक वर्षे आर्यसमाजाचे अध्यक्ष होते. १९३२ नंतर विनायकराव विद्यालंकार या त्यांच्या पुत्राने आर्यसमाजाच्या नेतृत्वाची धूरा वाहिली.(७४)

आपली धार्मिक कृत्ये पार पाडताना सरकारी यंत्रणा किंवा कायदे जर आड येत असतील तर अशा यंत्रणेस विरोध करण्याची प्रवृत्ती लोकामध्ये आर्यसमाजाने निर्माण केली. यात शंका नाही. १९३८ साली सोलापूर येथे आर्यसमाजाच्या पार पडलेल्या सम्मेलनात संस्थानातील राज्यकर्त्यांच्या विरोधात सत्याग्रहाच्या मार्गाने लढा देण्याचा ठराव मंजूर झाला व जेंव्हा प्रत्यक्ष सत्याग्रहाला सुरुवात झाली तेंव्हा संस्थानातील व संस्थानाबाहेरील हजारो कार्यकर्ते या चळवळीत सामील झाले.(७५)

आर्य समाजाने आपले कार्य शहरापुरते मर्यादित न ठेवता ग्रामीण भागातही चालू ठेवले. राजसत्तेला आव्हान देवून लोकशाही जागृत करणा-या संघटनामध्ये हैद्राबाद संस्थानातील आर्यसमाज या संघटनेने सिंहाचा वाटा उचलला यात शंका नाही. आर्यसमाज चळवळीचे उद्देश राजकीय व बिगरराजकीय स्वरुपाचे होते. त्यांनी धार्मिक प्रसाराचा व राष्ट्रीय स्वाभिमान निर्माण व जागृत करण्याचा उद्देश चळवळीत ठेवला होता. केशवराव कोरटकर, विनायकराव विद्यालंकार, पंडित नरेंद्र श्यामलाल, बन्सीलाल इत्यादी प्रमुख नेते प्रभावी वक्ते असल्याने सामान्य

जनतेवर त्यांच्या भाषणाचा फार मोठा प्रभाव पडत असे. (७६) हे नेते नंतरच्या काळात स्टेट कॉंग्रेसमध्ये सहभागी झाल्यामुळे ही चळवळ कॉंग्रेससाठी उपयुक्त ठरली.

उध्दवरावानी खुद्द असे म्हटले आहे की, चुलते आर्यसमाजाच्या चळवळीत होते. पंडीत शामलालजी, बन्सीलालजी, पंडीत नरेंद्रजी यांच्या भाषणांनी आमची मने भारावली जात. यावरुन बहुजन समाजातील बहुसंख्य तरुणांचे आकर्षण आर्यसमाजाची चळवळ बनलेली दिसते. पंडीत नरेंद्रजीना जेंव्हा निजाम सरकारने अटक केली तेंव्हा अटकेचा निषेध व्यक्त करण्यासाठी उध्दवराव पाटील व त्यांच्या विद्यार्थी मित्रानी एक दिवस शाळा बंद पाडली. (७७)

खुद्द स्वामी रामानंद तिर्थांनी म्हटले आहे, हैद्राबाद संस्थानातील बिकट परिस्थितीत जनतेला स्वाभिमानाची जाणीव करुन देवून त्या स्वाभिमानाचे रक्षण करण्याची जीद्द जनतेत निर्माण करण्याचे कार्य पंडित नरेंद्रजीनी पार पाडले. (७८) असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. संस्थानातील मुस्लीम राजवटीच्या उन्मत्तपणाला शह देण्यासाठी आर्यसमाजाने एक संघटीत अशी संस्था उभी केली होती. आर्यसमाजाचे कार्य जरी धार्मिक पुनरुज्जीवनाचे असले तरी संस्थानातील सामान्य जनतेमध्ये अन्यायाविरुध्द प्रतिकार करण्याची जाणीव तिनेच निर्माण केली होती. तत्कालीन समाजाची गरज म्हणून तिच्याकडे पाहणे इष्ट ठरेल.

## हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस :

हैद्राबाद संस्थानातील सुशिक्षित तरुणांच्यामध्ये राष्ट्रीय भावना जागृत झाल्यामुळे त्यांच्या सामुहिक शक्तीचा अविष्कार म्हणजेच

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना होय. जनतेचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी या संघटनेने अतोनात कष्ट घेतले. सुरुवातीला निश्चित वैचारिक दिशा या संघटनेला नव्हती. परंतु पुढे झालेल्या चळवळीतून संघटनेची शक्ती वाढली. जून १९३७ मध्ये लातूर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाने स्टेट कॉंग्रेसच्या कार्यास गती प्राप्त झाली. हा काळ हिंदु मुस्लीम दंग्याचा काळ होता. हिंदुच्या मनात असंतोष धुमसत होता. सतत चाललेली दडपशाही हिंदुना असह्य होत होती. अशा दडपशाही विरुद्ध हिंदूनी उठावणी चालविली होती. परंतु दुर्दैवाने त्या विरोधाला धार्मिक स्वरुप प्राप्त होत गेले. लोकांची मते जर अधिक हितकर व विधायक दिशेकडे वळविली नाहीत तर [redacted], अनेक ठिकाणी रक्तपात होईल अशी चिन्हे दिसत होती. यासाठी नागरी स्वातंत्र्याच्या तालावर कायदेभंग करणे आवश्यक होते व त्यासाठी बहुजन समाजाची नेतृत्व करणारी एखादी राजकीय संघटना हवी होती. यातूनच स्टेट कॉंग्रेसची निर्मिती झाली.(७९)

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने ऑगष्ट १९३८ मध्ये अस्थायी समितीच्यावतीने एक पत्रक काढले. त्यानुसार आपले उद्देश स्पष्ट केले. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची पुढील उद्दिष्टये होती. निजामाच्या छत्राखाली जबाबदार शासनपध्दती स्थापन करावी, सर्व जमातीत ऐक्य निर्माण करावे, राष्ट्रीय प्रवृत्तीची संघटना आणि उद्देश साध्य करण्यासाठी शांततामय व सनदशीर मार्गाचा अवलंब करावा. राष्ट्रीय भावना बळकट करण्यासाठी नागरिकांनी स्टेट कॉंग्रेसचे सभासद व्हावे असे आव्हानही या पत्राकात करण्यांत आले होते.(८०)

९ सप्टेंबरला संघटनेची घटना व पदाधिकारी निवडण्यासाठी बैठक बोलाविण्यात येणार होती, परंतु ७ सप्टेंबर १९३८ ला

सरकारने एक हुकूम काढून या संघटनेवर बंदी घातली. संघटनेने सरकारच्या या निर्णयाविरूध्द चळवळ करण्याचा निर्णय घेतला. २४ ऑक्टोबर १९३८ साली पहिला सत्याग्रह करून सरकारपुढे आव्हान उभे केले. याच दरम्यान विद्यार्थी वर्ग याकडे ओढला गेला. १९३८ नंतर संघटनेच्या बांधणीत राष्ट्रीय प्रवृत्तीचा विचार प्रमुख होता. स्वातंत्र्यप्राप्ती हे संघटनेचे प्रमुख ध्येय होते. राष्ट्रीय एकात्मता व लोकशाहीकरण या मुख्य सूत्रानुसार कॉंग्रेसने चळवळ सुरू केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संस्थान भारत सरकारमध्ये (राज्यामध्ये) विलीन करण्यासाठी जोरदार चळवळ केली. ७ ऑगष्ट १९४७ ला कॉंग्रेसतर्फे हिंदी संघराज्य विलीनीकरण दिन पाळण्यांत आला.(८१)

हैद्राबाद संस्थानात स्टेट कॉंग्रेस प्रभावी संघटना होती. राजकीय स्थिती पालटण्यात या संघटनेचा महत्वाचा वाटा आहे. पोलीस कारवाईनंतर राज्यात प्रभावी असलेली ती एकमेव राजकीय संघटना होय. साम्यवादी पक्षाचा प्रभाव संस्थानात फारसा नव्हता. इतेहादूल मुसलमीन संघटनेचे अस्तित्व संपुष्टात आले होते. भावी सत्तेच्या राजकारणात स्टेट कॉंग्रेसला उज्वल भवितव्य होते. स्वामी रामानंद तिर्थ यांचे नेतृत्व या संघटनेला लाभले होते. परंतु पुढे नेतृत्वावरून त्यात वाद निर्माण झाला. संघटना फुटते की काय अशी भिती निर्माण झाली. स्वामी रामानंद व बी. रामकृष्ण असे दोन गट पडले.(८२) त्यांच्यातील मतभेद मिटविण्याचे कार्य वल्लभभाई पटेलानी केले. मुख्यत: या गटबाजीचे कारण म्हणजे सरदार व नेहरू गटातील हा संघर्ष होय. स्वामीजी नेहरूंचे नेतृत्व मानणारे होते. हा संघर्ष खऱ्या अर्थाने उदारमतवादी विरूध्द परिवर्तनवादी असाच होता. स्टेट कॉंग्रेसमधील नेत्यावर गांधीवादाचा फार मोठा प्रभाव होता हे त्यांनी चळवळीसाठी अवलंबिलेल्या सत्याग्रहासारख्या मार्गावरून दिसून येते. प्रत्येक महत्वाच्यावेळी गांधीचा सल्ला

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.

घेतला जात असे. हैद्राबाद मुक्ती संग्रामानंतर स्टेट कॉंग्रेसचे विलीनीकरण राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये झाले.

## सत्यशोधक समाजाच्या पोटातून हळूहळू निर्माण होणारा समाजवादी विचार :

महाराष्ट्रात फुलेंच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक समाजाची चळवळ जोर धरू लागली. शाहू महाराजासारख्यांचा राजाश्रय या चळवळीला मिळाला होता. बहुजन समाजातील बहुसंख्य मंडळी या चळवळीकडे आपली चळवळ म्हणून आकर्षिली गेली होती. टिळकांचा मृत्यु झाल्यानंतर महात्मा गांधीने हा बहुजन समाजातील वर्ग राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळीत सामील करून घेण्यात यश मिळविले होते. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या चळवळीची धार बोथट झाली होती.(८३)

हैद्राबाद संस्थानात आर्यसमाजाची चळवळ निर्माण झाली. गांधीवादाचा प्रभाव असणारी स्टेट कॉंग्रेसची चळवळ निर्माण झाली. पुढे या स्टेट कॉंग्रेसच्या कारभाराला कंटाळून सत्यशोधक समाजाचा प्रभाव असणारी विचारसरणी मराठवाडयात निर्माण झाली. त्यामध्ये खालील राजकीय पक्षांचा प्रामुख्याने समावेश होतो. १९४९ च्या शेवटी झालेल्या संघटनात्मक निवडणूकीनंतर स्टेट कॉंग्रेसमध्ये राजीनामा देण्याचे तंत्र सुरू झाले. फेब्रुवारी १९५० मध्ये गोविंदभाई श्रॉफ, वैशंपायन, डॉ. मेलकोटे, सी. जगन्नाथराव या प्रमुख व्यक्तींनी स्टेट कॉंग्रेस सोडली. बी. रामकृष्णराव या तेलगु नेत्याचे नेतृत्व त्यांना मान्य नव्हते. जमीनदारी घराण्यातून आलेल्या या नेत्याचा प्रभाव निर्णय प्रक्रियेवर होत असल्याची तक्रार पक्ष सोडणाऱ्यांची होती. स्वामीजीनी या गटाला कॉंग्रेस न सोडण्याचा सल्ला दिला परंतु तो मानला नाही.(८४)

लिग ऑफ सोशॅलिस्ट वर्कस् :

स्टेट कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, वैशंपायन या प्रमुख नेत्यानी कॉंग्रेसला पर्यायी राजकीय शक्ती उभी करण्यासाठी नांदेड येथे १९५० मध्ये परिषद घेवून लिग ऑफ सोशॅलिस्ट वर्कस् या पक्षाची स्थापना केली. कॉंग्रेसने क्रांतीकारी स्वरूप सोडल्यामुळे या नव्या पक्षाची स्थापना करण्यांत येत आहे असे मत व्यक्त करण्यांत आले. याच बैठकीत पक्षाचे पुढील उद्देश निश्चित करण्यांत आले. देशात सामाजिक क्रांती घडवून स्वातंत्र्य व समता हे मूल्य गरीब जनतेपर्यन्त पोहोचविणे, समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सामाजिक व आर्थिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणे, वर्गाच्या आधारावर आर्थिक स्वरूपाच्या संघटना करून वर्ग संघर्षास जनतेला तयार करणे. (८५)

नांदेड परिषदेनंतर या पक्षाची अधिकृत स्थापना करण्यांत आली. किसान परिषदेची मराठवाडयात स्थापना करून आर्थिक प्रश्नावर चळवळ उभी करण्याचा प्रयत्न संघटनेने केला. १९५२ च्या निवडणूकीत पक्षाने कम्युनिस्टाशी आघाडी करून कॉंग्रेसला जोरदार लढत दिली. परंतु निवडणूकीत म्हणावे तसे यश न लाभल्याने पुढे १९५३ साली संघटनेचे अधिकृत विसर्जन करण्यांत आले.

शेतकरी कामगार पक्ष :

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये नेतृत्वावरून दोन गट पडले होते. एक जनार्दन देसाई गट व दुसरा स्वामी रामानंद गट. देसाई गटाची विचारसरणी वल्लभभाई पध्दतीची होती तर स्वामीजी नेहरूवादी विचाराचे होते. कॉंग्रेस अंतर्गतच कांही मंडळी मार्क्सवादी लेनिनवादी

विचारांची असल्यामुळे या दोन्ही गटात सामावू शकली नाहीत. त्यांनी कॉंग्रेस अंतर्गतच शेतकरी संघ काढला. त्याला मान्यता देण्याचा प्रश्न निर्माण झाला.(८६) दरम्यानच्या काळात मुंबई राज्यातील बहुजन समाजातील पुढा-यांच्या विचारातून शेतकरी पक्षाची निर्मिती झाली. या पक्षाची वैचारिक भूमिका साम्यवादी तत्त्वज्ञानावर आधारित होती. दाभाडी येथे १९५0 साली झालेल्या ठरावात लिखित स्वरूपात ही वैचारिक भूमिका आढळते. १९४६-४७ च्या दरम्यान मुंबई राज्यातील प्रमुख नेत्यांचा संपर्क मराठवाडयात वाढला. क्रांतीसिंह नाना पाटील, भाई जी. डी, लाड, ए. डी. भोसले यांचा यात प्रामुख्याने समावेश होतो.(८७)

ब्राम्हणेतर चळवळीच्या परंपरेतून आलेल्या या नेत्यानी मराठवाडयात शेतकरी संघटीत करण्याचा प्रयत्न केला होता. या चळवळीच्या निमित्ताने आण्णासाहेब गव्हाणे (परभणी), नरसिंगराव देशमुख (काटीकर), उध्दवराव पाटील (उस्मानाबाद), ज्ञानेश्वर पाटील (बार्शी) भाऊसाहेब भोकरदनकर इत्यादी बहुजन समाजातील नेते त्यांच्या संपर्कात आले. त्यांनी स्टेट कॉंग्रेसमध्ये शेतकरी संघ स्थापन केला. या संघाच्या मान्यतेवरूनच कॉंग्रेसमध्ये वाद निर्माण झाला. त्याच काळात शेतकरी कामगार पक्षाचे नेते कै. केशवराव जाधव, कै. शंकरराव मोरे, कै.नाना पाटील, जी. डी, लाड यांनी मराठवाडयात दौरा केला. त्यामुळे मराठवाडयात शेतकरी संघाचे काम करणा-या या प्रमुख कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात जाण्याचा निर्णय घेतला.(८८)

शेतकरी कामगार पक्षाचे मराठवाडयात परभणी, उस्मानाबाद व नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागात काम वाढले. १९५२ च्या विधानसभेच्या निवडणूका या पक्षाने स्वबळावर लढवून हैद्राबाद

How many seats did won.

राज्यात दुसऱ्या क्रमांकावर मते व जागा मिळविण्यात यश प्राप्त केले.
(निवडणूक आयोग अहवाल १९५२)[८९]

## संद-र्भ सूची

### प्रकरण १ ले : मराठवाड्यातील सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूती


(१) प्रा. कुरुंदकर नरहर - हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन
संपादक प्रा. द. पं. जोशी पृष्ठ - ६

(२) हैद्राबाद संबंधीच्या घटना व आकडेवारी - संचालक, सांख्यिकी
विभाग, हैद्राबाद १९५१ पृष्ठ - १

(३) बिंदू दिगंबर - हैद्राबाद राज्याचे विसर्जन
साकेत प्रकाशन औरंगाबाद मार्च १९८८ पृष्ठ २३,२४

(४) तीर्थ स्वामी रामानंद - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी
पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६ पृष्ठ - ६४

(५) उक्त पृष्ठ - ६४

(६) उक्त पृष्ठ - ६५

(७) उक्त पृष्ठ - ६५

(८) बिंदू दिगंबरराव उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २७ - २८

(९) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ४३

(१०) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट - पृष्ठ २८ - २९

(११) भारतीय जनगणना (१९४१) पृष्ठ ६ ते ११

(१२) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ५९

(१३) उक्त पृष्ठ - ५९

(१४) उक्त पृष्ठ - ६०

(१५) श्रॉफ गोविंदभाई - मराठवाडा आणि स्वातंत्र्य आंदोलन ३ लेख
दैनिक अजिंठा - २४.६.१९८६

(१६) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ६३

(१७) उक्त पृष्ठ - ७५

(१८) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ७२

(१९) उक्त पृष्ठ - ७३

(२०) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ~~७२~~ ६०

(२१) उक्त पृष्ठ - ६२

(२२) तिर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ६५, ६६

(२३) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ३३

(२४) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ८१ ते ८४

(२५) उक्त पृष्ठ - १७२

(२६) कल्याणकर बा. ह. - संघर्ष - खा. बाळासाहेब पवार पृष्ठ २३

(२७) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २१५

(२८) भालेराव अनंत - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा
भारत मुद्रक आणि प्रकाशक लिमिटेड औरंगाबाद
सप्टेंबर १९८७ पृष्ठ ८८

(२९) उक्त पृष्ठ -८८

(३०) उक्त पृष्ठ ८८-८९

(३१) उक्त पृष्ठ ८९

(३२) उक्त पृष्ठ ८९

(३३) उक्त पृष्ठ ९०

(३४) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १७१

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

(३५) भालेराव अनंत - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ९३

(३६) उक्त पृष्ठ - ९६

(३७) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १७२

(३८) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३१

(३९) उक्त पृष्ठ - ३२

(४०) उक्त पृष्ठ - ३२

(४१) उक्त पृष्ठ - ६९

(४२) उक्त पृष्ठ - ७७

(४३) उक्त पृष्ठ - ७८

(४४) उक्त पृष्ठ - ७८

(४५) उक्त पृष्ठ - ८०

(४६) उक्त पृष्ठ - ८२

(४७) उक्त पृष्ठ - ७९

(४८) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९५ ते ९७

(४९) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - ८५

(५०) उक्त पृष्ठ - ८९

(५१) उक्त पृष्ठ - ९१

(५२) उक्त पृष्ठ - ९०

(५३) उक्त पृष्ठ - ९१

(५४) उक्त पृष्ठ - ९५

(५५) मेनन व्ही. पी. " द स्टोरी ऑफ इंटीग्रेशन ऑफ इंडियन स्टेटस् " (ओरेन्ट दिल्ली १९५६) पृष्ठ - ३५०

(५६) उक्त पृष्ठ - ३२४

(५७) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - १९५

(५८) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - १०२

(५९) उक्त पृष्ठ - १०३

(६०) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २३

(६१) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - १९६

(६२) उक्त पृष्ठ २०३, २०४

(६३) उक्त पृष्ठ २०२

(६४) भाई लाड जी. डी. - पेटलेले पारतंत्र्य धुमसते स्वातंत्र्य भारती प्रकाशन पुणे पृष्ठ - १९४

(६५) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २४

(६६) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २०२

(६७) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २४

(६८) उक्त पृष्ठ - ३०

(६९) उक्त पृष्ठ - ३०

(७०) भाई लाड जी. डी. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ- १९०

(७१) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २४

(७२) उक्त पृष्ठ - २५

(७३) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २०८

(७४) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २५

(७५) उक्त पृष्ठ - २६

(७६) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - २३

(७७) उक्त पृष्ठ - २३

(७८) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९०

(७९) उक्त पृष्ठ ७४-७५

(८०) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ७८

(८१) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १८६

(८२) बिंदू दिगंबरराव - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ७८

(८३) फडके य. दी. - जेधे केशवराव
श्री विद्या प्रकाशन पुणे पृष्ठ १३८

(८४) तीर्थ स्वामी रामानंद - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २३७

(८५) श्रॉफ गोविंदभाई - मराठवाडा (अर्ध साप्ताहिक) २५-४-१९५०

(८६) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २५

(८७) लाड जी. डी. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ - १८८

(८८) कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ- २७

(८९) १९५२ निवडणूक अहवाल - १९५२ सार्वत्रिक निवडणूक
आकडेवारी